स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक** 19–06–2015 रोजी **दुपारी** 12–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे | सभापती |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 93</u>:— ठराव क्र. 71 दिनांक 20.07.2010, ठराव क्र. 50 दिनांक 28.05.2012 आणि ठराव क्र. 122, दिनांक 23.09.2013 अन्वये स्थायी समितीनी नागपूर शहरातील शहर बस मार्गावर ग्रुप–6 ते ग्रुप–10 अंतर्गत असलेले बस शेल्टर उभारणे व सुस्थितीत ठेवण्याचे काम बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर 10 वर्षा करीता Advertisement Rights वर मे. ग्रिन थंब इन्नोवेटर प्रा. लि. या कंपनीची ई–निविदा मंजूर केलेली आहे. मे. ग्रिन थंब इन्नोवेटर प्रा. लि. ही कंपनी ला मे. कॉरटेल आऊटडोर एडवरटाईझींग प्रा. लि. हयांनी Take over & Transfer of Media Assets केल्यामुळे दोन्ही कंपनीने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मे. गिन थंब इन्नोवेटर प्रा. लि. ऐवजी मे.

कारटेल आऊटडोर एडवरटाईझींग प्रा. लि. या नावाने बदल करणे व या कामा करीताचे कार्यादेश, करारनामा व पुढील पत्र व्यवहार इत्यादि सर्व या नंतर मे. कारटेल आऊटडोर एडवरटाईझींग प्रा. लि. या कंपनीच्या नावाने कामाचे हस्तांतरण करणे व काम त्यांचे कडून करवून घेण्याकरिता मंजूरी प्रदान करण्याचे प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने सुचित केल्याप्रमाणे दिल्ली व बंगलुर च्या बस थांब्याचे नविन डीझाइन प्राप्त झाले आहे त्याप्रमाणे ग्रुप 6 ते ग्रुप 10 चे बस थांबे बनविण्यात यावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 94</u>:— नागनदीला मिळणाऱ्या गंगाबाई घाट जवळील हत्ती नाल्यावर पुलाचे बांधकामाकरीता प्राप्त तीन निविदापैकी मे. सुविचार कंस्ट्रक्शन्स, यांची प्राकलनीय राशीपेक्षा 11.25 टक्केने कमी दराची रू. 3,17,62,521/— ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 95</u>:— नागपूर शहर मंजुर विकास आराखडया नुसार EP/69 नार्थ अंबाझरी रोड वरील विद्यापीठ वाचनालय ते महाराजबाग चौक अमरावती रोड पर्यंतच्या 24.00 मीटर रस्त्याचे रूंदीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदा निम्नत्तम दराची मे. एस.के.गुरूबक्षाणी याची 4.00टक्के अधिकची रू. 4,74,26,854/— रक्कमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 96</u>:— प्र.क्र. 20 अ आणि ब मधील आंबेडकर कॉलोनी लष्करीबाग येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदा पैकी मे. लोटस् कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 4.75 प्रतिशतने अधिक दराची रू. 31,40,332/— (एकतीस लक्ष चाळीस हजार तिनशे बत्तीस रूपये) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी रू. 29,97,930/— पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 97</u>:— नागपूर शहर मंजुर विकास आराखडयानुसार प्रभाग 9 छिंदवाडा रोड (मेन्टल हॉस्पीटल व शासकीय क्रिडा सकुलच्या मधून) ते पोलिस क्वार्टरच्या मधुन 24 मिटर रूंदीचा रस्ता विकासीत करण्याकरीता रू. 15,18,31,670/— चे ढोबळ प्राकलण प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A42101370616 अंतर्गत खर्चाची तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्नासह खालील बाबतीत मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. संबंधीत रस्ता मौजा (1) जरीपटका खसरा क्र. 2/1, मिककियत सरकार, जे.ई. मेडीकल विभाग हॉस्पीटल नागपूर तसेच (2) मौजा पोलिस लाईन खसरा क्र. 6,7,8,9 व 14 मधुन आहे.
2. रस्त्याचा जागेची संयुक्त मोजणी, सिमांकण व हद्द कायम करण्याकरीता नगर भुमापण अधिकारी क्र. 3 नागपूर मार्फत आवश्यक फि भरून करून घेण्याकरीता प्रस्ताव सादर केले असता नगर भुमापन अधिकारी 3 ने मौजा

जरिपटका करीता रू. 1,52,000/- व मौजा पोलीस लाईन टाकळी करीता रू. 34,32,000/- असे एकुण रू. 35,82,000/- ची भरणा रिझर्व बॅकेत भरण्याबाबत कळविले आहे.

3. मोजणी प्रमाणे रस्त्याकरीता शासकीय मालकीची आवश्यक जागा म.न.पा. ला विना मुल्य हस्तांतरीत करण्याकरीता शासन निर्णय दिनांक 18.09.2010 अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना सादर करण्यात येईल. व खाजगी मालकीची असल्यास भुअर्जनाचा प्रस्ताव नगर रचना विभागा मार्फत कार्यान्वीत करण्यात येईल.

ठराव क्रमांक 98:— हुडकेश्वर नरसाळा क्षेत्रातील निळकंठनगर, हुडकेश्वर (बु.) व नरसाळा जलकुंभावरील जलवाहीण्याचे बळकटीकरण करण्याकरीता नविन पाईपलाईन टाकण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.एम. एस. इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची प्राकलनीय दरापेक्षा 8.10 टक्के कमी दराची रू. 5,91,77,672/- रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 99:— प्रभाग क्र. 27 आग्याराम देवी चौक ते गणेश घाट पर्यन्त सुभाष रोड येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. ओ. जी. बजाज यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.90 टक्के अधिक दराची रू. 6552731/- (पास्ष्ठ लक्ष बावन हजार सातशे एक्कतीस) स्विकृत करण्याचा प्रश्न, तसेच हे काम पद क्र. 682 ( A22001330803) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी रू. 6552731/- लक्ष पर्यन्त सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 100:— रेशिमबाग येथे कवि सुरेश भट सभागृहाचे उर्वरित स्थापत्य बांधकामाकरीता प्राप्त तीन निविदापैकी मे. सादिक ॲन्ड कंपनी यांची प्राकलनीय राशीपेक्षा 5.67 टक्के ने कमी दराची रू. 14,48,95,428/- रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 101:— नागपूर शहरातील पथदिव्यांच्या साहित्याचा पुरवठा करून देखभाल दुरूस्ती करणे या कामाचे एकुण 9 एजन्सीज्ना झोन निहाय देण्यात आलेल्या कंत्राटाचा कालावधी दिनांक 30.06.2015 पर्यंत वाढवून देण्यास व या वाढीव कालावधीच्या एकुण रू. 590.58 लक्षच्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन वाढीव कालावधीच्या एकुण रू. 890.58 लक्षच्या खर्चास मंजूरी प्रदान करून, 30 सप्टेंबर 2015 पर्यंत मुदतवाढ देण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 102:— अंबाझरी तलावात 3 वर्ष कालावधीकरीता मत्स्यव्यवसाय करण्याचा कंत्राट देण्याकरीता निविदा बोलविल्या असता प्राप्त 18 निविदांपैकी उच्चतम निविदाधारक श्री. मनोज बैसवारे याच्या रूपये 2,63,00,000/- च्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. च्या अंबाझरी उद्यानाचा प्रकल्प या वर्षात सुरु होणार आहे हया प्रकल्पाला या कंत्राटापासून कोणतीही बाधा भविष्यातील सर्व प्रकल्पाला होणार नाही अशी हमी निविदाकाराकडून घ्यावी व करारनाम्यात अट टाकावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 103</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |